**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १/२०१६-१७/५७ दिनांक: २२.०६.२०१६

**आदेश केस क्र. १/२०१६-२०१७**

१) श्री. बशिर हाशम मुल्ला, : अर्जदार.
चिंचणी रोड, तासगांव,
जिल्हा सांगली.

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता, विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, ग्रामिण, सांगली.

३) उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, तासगांव २.

**कोरम:-** १. श्री. पी.व्ही. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. पी.व्ही.खपली, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

तक्रारदार श्री.बशिर हाशम मुल्ला, ग्रा.क्र.२८१५१०४९५३३० यांनी मंचाकडे न्याय मिळण्यासाठी तक्रार दाखल केली आहे. या केसची सुनावणी दि.२४-०५-२०१६ रोजी घेण्यात आली आहे, सदर सुनावणीस कार्यकारी अभियंता, ग्रामिण सांगली व उपकार्यकारी अभियंता, तासगांव २, तसेच ग्राहक प्रतिनिधी श्री.अलमशहा मोमिन व ग्राहक स्वत: हे या सुनावणीसाठी उपस्थित होते.

## (१) तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी .

श्री.बशिर हाशम मुल्ला रा.तासगांव ता.तासगांव जि.सांगली येथील रहिवाशी आहेत. त्यांना वितरण कंपनीने दि.२०-०९-२०१५ रोजी नवीन घरगुती वीज कनेक्शन दिले आहे. जागेचे मालक कै.मौलाना सिध्दीकी जमादार हे मयत झाल्यामुळे नवीन कनेक्शन घेतेवेळी त्यांनी स्वत: खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र लिहून दिले

"भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास अथवा तक्रार निर्माण झाल्यास वीज कनेक्शन बंद करावे लागलेस कोणत्याही प्रकारची तक्रार करणार नाहीञ तसेच या कनेक्शनचा जागेचा हक्क कब्जा वहिवाट सांगणेसाठी वापर करणार नाही".

श्री फिरोज ईलाईबक्ष मणेर यांनी वरील कनेक्शनबद्दल तक्रार दाखल केलेली आहे. शिवाय त्या वरील जागेबाबत मूळ मयत मालक यांचेसोबत झालेला करारनामा व इतर आवश्यक कागदपत्रे जोडून श्री बशिर हाशम मुल्ला यांना वितरण कंपनीने दिलेल्या घरगुती वीज कनेक्शनबाबत आक्षेप घेतला असून विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबत वकीलामार्फत नोटीस दिली आहे.

वितरण कंपनीने श्री बशिर हाशम मुल्ला यांना याविषयी कळवून रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा मालकी हक्काबाबतचा पुरावा सादर करणेस दि.०९-११-२०१५ रोजी नोटीसव्दारा कळविले. परंतु श्री बशिर हाशम मुल्ला यांनी कागदपत्रे वेळेत सादर न केल्यामुळे दि.२३.१२.२०१५ रोजी त्यांचा वीज पुरवठा वितरण कंपनीने करारनाम्यानुसार खंडीत केला.

यामुळे श्री बशिर हाशम मुल्ला यांनी क्ष फॉर्ममध्ये सांगली अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे याविषयी दि.१८.०१.२०१६ रोजी तक्रार दाखल केली व सांगली कक्षाने दिलेल्या दि.१९.०३.२०१६ रोजीचा निर्णयाबद्दल समाधान न झाल्यामुळे अ फॉर्ममध्ये ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर येथे दि.०१.०४.२०१६ रोजी तक्रार दाखल केली.

श्री फिरोज ईलाईबक्ष मणेर हे स्वत: मी रहात असलेल्या २५१, मळे, चिंचणी रोड, तासगांव या जागेचे अधिकृत मालक नाहीत. ती जागा खरेदी बाबतचा जागेचे मालक कै.मौलाना सिध्दीकी जमादार व श्री फिरोज ईलाईबक्ष मणेर यांचा करारनामा व इतर कागदपत्रे सादर केली. परंतु मूळ जागेचे मालक मयत झाल्यामुळे त्याबाबतचा त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण होवू शकला नाही. त्यामुळे वरील जागेबाबत मालकी हक्काविषयी अनिश्चितता निर्माण झाली आहे. म्हणून श्री फिरोज ईलाईबक्ष मणेर यांना मी राहात असलेल्या जागेमधील वीज पुरवठा खंडीत करण्याविषयी तक्रार करणेचा हक्क राहात नाही. नगरपालिकेने त्यांचे जागेवर नाव चढविणेस स्थगिती दिली आहे. म्हणून तक्रारीचा अर्ज रद्द करुन माझा वीज पुरवठा पूर्ववत करावा अशी ग्राहकाची मागणी आहे.

प्रत्यक्ष चर्चा सादर केलेली कागदपत्रे आणि विनिमयातील तरतुद यावरुन खालील मुद्दे उपस्थित होतात.

१.	अर्जदार श्री. बशिर हाशम मुल्ला यांना विदयुत पुरवठा पूर्ववत करता येईल काय?

उत्तर : होय. नियमाप्रमाणे.

२.	आदेश.

उत्तर	: अंतिम आदेशाप्रमाणे.

**कारण मिमांसा.**

तक्रारदार श्री. बशिर हाशम मुल्ला, तासगांव हे घरगुती वीज ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र.२८१५१०४९५३३० असा आहे. त्यांना वितरण कंपनीने २०.०९.२०१५ रोजी कनेक्शन दिलेले आहे. ते राहात असलेल्या जागेचे घरमालक मृत्यू पावल्यामुळे व त्या जागा मालकीबद्दलची अधिकृत नोंदणी नसल्यामुळे महावितरण कंपनीने करारनामा लिहून त्यांना कनेक्शन दिलेले आहे. श्री मणेर फिरोज ईलाईबक्ष यांनी त्यांचेकडे असलेले जागा खरेदीबाबतची नोंदणीकृत करारनाम्याची प्रत वितरण कंपनीकडे देवून श्री. बशिर हाशम मुल्ला यांना दिलेला वीज पुरवठयाबाबत हरकत घेतली. वितरण कंपनीचे विधी सल्लागार, पुणे यांनी श्री. बशिर हाशम मुल्ला यांचेकडे रहिवास पुरावा नसल्यामुळे यांना वीज पुरवठा पूर्ववत करण्यात येवू नये असा सल्ला दिला आहे. वरील जागेच्या मालकी हक्काबाबत अनिश्चितता निर्माण झालेली आहे या कारणास्तव या जागेबाबत जोवर कायदेशिरपणे जागा मालकाची रितसर नोंद होत नाही तोवर तक्रार अर्जाचा विचार करण्याचे कारण नाही. श्री. बशिर हाशम मुल्ला तिथे राहात असलेबद्दल तसेच त्यांनी नगरपरिषदेचा दाखला अथवा अन्य योग्य पुरावा वितरण कंपनीकडे सादर केल्यास त्यांचा वीज पुरवठा पूर्ववत करण्यास काहीच हरकत नाही असे मंचास वाटते. जुन्या जोडणीची ठेव रक्कम नवीन जोडणीस वर्ग करावी. सर्व नियमांचे पालन करुन तक्रारदारास त्वरीत वीज जोडणी द्यावी.

**आदेश**

१)	तक्रार दाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२)	श्री बशिर मुल्ला यांनी संबंधित जागी रहिवासी असल्याबाबतचा नगरपरिषदेचा दाखला अथवा अन्य पुरावा सादर केल्यास त्यांचा वीज पुरवठा पूर्ववत करण्यात यावा.

३)	सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४)	या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : २२.०६.२०१६	(पी. व्ही.खपली)

सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

सही/-

श्री. पी. एस. बुरांडे,

सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.